# भूले नहीं जाना आज पहली तारीख है

" आपले उच्चायुक्त भारताचे अधिकृत प्रतिनिधी असले तरी तुम्ही सारेजण भारताचे आणि महाराष्ट्राचे खरे सांस्कृतिक प्रतिनिधी आहात तेव्हा या संस्कृतीचा मिलाफ सिंगापुरी संस्कृतीशी घडवून वसुधैव कुटुम्बकम् या उक्तीचा प्रत्यय आणून द्या. तुम्ही इथं आलात तो ब्रेन ड्रेन आहे असं मी मुळीच मानीत नाही. उलट तुमचं इथलं कार्य भारताच्या विकासाला आणि आंतरराष्ट्रीय संबंधांना पोषकच होईल." या शब्दांत सिंगापुरी मराठी बांधवांशी सहजसंवाद साधण्यास आले होते भारताचे गृहमंत्री माननीय श्री.शिवराजजी पाटील.

"भूले नहीं जाना आज पहली तारीख है " असं घोकत एक जूनला महाराष्ट्र मंडळ सिंगापूरचे बरेच सभासद ऑफिसातून धावतपळत आले होते.काश्मीरचे आतंकवादी, अरुणाचल प्रदेशाचे अराजकवादी, आंध्रातील नक्षलवादी, या लोकशाहीतील अडसरांच्या बरोबर भूकंप, महापूर, यांसारख्या नैसर्गिक कटकटींनाही शांतपणे सामोरे जाण्याची कसरत दररोज करीत असतात आपले गृहमंत्री ! तेव्हां ते आज आपल्याला काय सांगणार ही उत्सुकता सर्वांच्याच मनांत होती.



सिंगापुरी उपपंतप्रधानांचे खास पाहुणे म्हणून दोन दिवस गंभीर चर्चा व आग्नेय आशियाई अध्ययन संस्थेमध्ये व्याख्यान असा कडक कार्यक्रम झाल्यावर माननीय मंत्री रमले कशात तर मंडळाच्या कलावंतांनी सादर केलेल्या अस्सल मराठमोळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांत ! गणेशवंदन,

सरस्वतीस्तवन, लावणी, आधुनिक मराठी नृत्य, या बालकलाकारांच्या आविष्कारानंतर प्रौढांचे एकपात्री प्रवेश, द्वंद्वगीत आणि कविता असे वैविध्यपूर्ण कार्यक्रम सादर करतांना निवेदन होतं इंग्रजीतून, कारण मंत्रीमहोदयांसमवेत बरीच अमराठी मंडळी होती !

मंडळाचे अध्यक्ष श्री. अजय काशीकर यांनी मंत्रीमहोदयांना शाल व स्मृतिचिन्ह अर्पण केल्यावर थोड्या गप्पागोष्टी अथवा प्रश्नोत्तरांच्या अपेक्षेने थांबलेल्या प्रेक्षकांना चकवून सिंगापुरी सरकारचे संरक्षक पथक मंत्रीमहाशयांना घेवून गेले देखील !





तरीही पाटीलबाबांचे हे शब्द सर्वांनाच सुखावून गेले... “मी गेल्या दहा वर्षात दिल्लीला काय , महाराष्ट्रातदेखील असा कार्यक्रम पाहिला नाही ! ”

सुधीर निखारगे
सचिव , महाराष्ट्र मंडळ, सिंगापूर
दिनांक 1 जून 2006